ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

## August Special Issue II



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT | LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Editor
**Prin.Dr.Shivdas Shirsath**

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal**

**Editor**

***Prin. Dr. Shivdas Shirsath***
*M. S. P. Mandal's,*
*Arts, Commerce and Science College,*
*Kille Dharur, Dist. Beed 431124 Maharashtra*

**Price : Rs. 300/-**
**Annual Subscription: Rs. 1000/-**

T.S.S's. Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Tal. Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal. Sakri, Dist.Dhule

Scanned with OKEN Scanner

अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली | अजय मारोती पाटील | 1-4 |
| 2 | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली | श्री.काचगुंडे हनुमंत<br>प्रा. डॉ.दिलीप ज्ञानोबा भिसे | 5-9 |
| 3 | जागतिकीकरण व आदिवासी लोकगीते | श्री.भगत किशोर बाबुराव<br>प्रा.डॉ. दिलीप ज्ञानोबा भिसे | 10-13 |
| 4 | जागतिकिकरण व आदिवासी लोकनृत्य | प्रा. डॉ.पंजाब शेरे | 14-17 |
| 5 | "मराठी लोकसाहित्यातील गोंधळ एक लोककला" | प्रविण शंकर सोलनकर | 18-22 |
| 6 | जागतिकीकरण आणि आदिवासी लोकगीते | प्रा.डॉ.राजू मोतेराव | 23-27 |
| 7 | पारपारिक भारतीय आदिवासी समुदायातील लोककथेचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा.डॉ.संजय सुरेवाड | 28-33 |
| 8 | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली | सारिका संदिपान फरांडे | 34-37 |
| 9 | जागतिकीकरण आणि दलित कविता | शारदा किशन धामणगांवकर | 38-41 |
| 10 | जागतिकीकरण आणि आदिवासी लोककथा | प्रा.डॉ.शोभा डहाळे | 42-45 |
| 11 | जागतिकीकरण आणि गोमंतकीय आदिवासी जीवन | डॉ.स्नेहा सुवास प्रभु महांबरे | 46-52 |
| 12 | जागतिकीकरण आणि आदिवासी लोकगीते | प्रा.सुपारे यु.पी. | 53-58 |
| 13 | आदिवासी बोलीभाषा | डॉ.विठ्ठल केदारी | 59-61 |
| 14 | स्वातंत्र्याच्या क्षितिजावर उगवलेला शौर्यतारा : भगवान बिरसा मुंडा | डॉ.कुंदा बाळासाहेब कयडे | 62-66 |
| 15 | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली | प्रा. पंडित मोरे | 67-71 |
| 16 | जागतिकीकरण आणि आदिवासी लोकगीते | प्रा.डॉ.वाल्मिक शंकर आढावे | 72-78 |
| 17 | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली : आव्हाने व उपाय | प्राचार्य डॉ.शिवदास शिरसाठ | 79-87 |
| 18 | मराठी आदिवासी कविता आणि बोली | प्रा.डॉ.गोविंद काळे | 88-91 |
| 19 | जागतिकीकरण आणि आदिवासी लोकगीते | प्रा.डॉ.वसुमती पी.पाटील | 92-95 |
| 20 | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | प्रा.लालबा दुमटकर | 96-100 |
| 21 | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली | प्रा.डॉ.देविदास खोडेवाड | 101-104 |
| 22 | वैश्यीकरण और आदिवासी लोक–कथाः हिंदी साहित्य के संदर्भ में | अशोक बाळू पाटील | 105-109 |
| 23 | आदिवासी लोकगीत और जनजागरण | वनिता कुमारी डोडियार | 110-113 |


T.S.S's. Smt. V.U. Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College, Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

Scanned with OKEN Scanner

# जागतिकीकरण आणि आदिवासी लोकगीते

प्रा.डॉ.वसुमती पी.पाटील
मराठी विभाग प्रमुख
व्ही.यु.पाटील कला व कै.डॉ.बी.एस.देसले विज्ञान महाविद्यालय,
साक्री, जि.धुळे

समाज निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. समाजातील अनेक पिढ्या त्यांचा एकमेकांशी असलेला सहसंबंध, आदान-प्रदान यामुळे जीवन जगण्याची एक विशिष्ट शैली निश्चित होत असते. समाजात राहणाऱ्या सर्व व्यक्तींना समूह जीवनासाठी परंपरा महत्त्वपूर्ण ठरतात. मौखिक परंपरेतून मानवी मन, समाजव्यवहार आणि सांस्कृतिक जीवन आविष्कृत होत असते. लोकांनी परंपरेने जपलेले मौखिक साहित्य म्हणजे लोकसाहित्य. एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत परंपरा जोपासणारे समूहमन लोकसाहित्यातून व्यक्त होत असते

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात मानवी स्वभाव आणि मानवी व्यवहाराचे चित्र बदलते आहे. जीवन, भावविश्व आणि समाजाचे चित्र पाहिले तर जागतिकीकरणाने मानवी जीवनाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रीतीने व्यापून टाकले आहे. अर्थात आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, माध्यमीय, सांस्कृतिक, धार्मिक, कृषी अशा अनेक क्षेत्रांना जागतिकीकरणाने विळखा घातला आहे. भौतिक सुख-सोयींचा सुकाळ यामुळे मानवी जीवन शैलीचा स्तर मात्र उंचावला आहे. आधुनिक समाजजीवनाचा संपर्क, जागतिकीकरणाचा जीवनमानावर झालेला प्रभाव, खेडी सोडून शहरांकडे धाव, जीवनमानात बदल या सर्व बाबींमुळे पारंपारिक जीवनप्रणाली मागे पडतांना दिसते.

आदिवासी समाजाकडे निसर्ग, यंत्र-तंत्र-मंत्र, जादूटोणा-प्राणी-वनस्पती यासंबंधी असलेले विपुल ज्ञान व त्यांच्या जीवनशैलीतील सामूहिक परंपरा यातून त्यांचे लोकसाहित्य नजरेस पडते. निसर्ग आणि जीवन एक अतूट नाते किंवा निसर्ग हा देव मानणारा आदिवासी समाज जीवनातील प्रत्येक व्यवहार सामूहिक भावनेने, सहज, अकृत्रिमरित्या पार पाडत असतो. आद्यमानव म्हणून आदिवासींचा उल्लेख होतो. त्यांची निसर्गाशरण जीवनशैली, परंपरा, संस्कृती यातून निर्माण होणारे त्यांचे साहित्य समृध्द आहे. आदिवासी साहित्य म्हणजे खऱ्या अर्थाने साहित्याचे मूळ आहे. त्याचा कर्ता अज्ञात असून अनादी काळापासून त्यांचे हे मौखिक साहित्य परंपरेने चालत आले आहे.



PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule
Scanned with OKEN Scanner

आदिवासी समाजाने जीवनातील बहुतेक सर्व प्रसंगांना उद्देशून गीते रचलेली आढळतात. प्रस्तुत शोधनिबंधात आदिवासी लोकगीत या संदर्भात मांडणी करतांना विशेषत: भिल्ल जमातीच्या लोकगीतांचे विवेचन केले आहे. भिल्ल जमात प्रामुख्याने महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश अशा प्रांतात आढळते. भिल्लांमधील वेगवेगळ्या जमातींमध्ये देखील वेगवेगळी बोली असते त्या त्या प्रदेशाचा किंवा तेथील भाषेचा प्रभाव त्यावर असतो. कोणत्याही भाषेतील लोकसाहित्यामध्ये लोकगीतांना भरणा अधिक असतो. त्याचप्रमाणे कोणत्याही प्रदेशातील आदिवासी लोकसाहित्यातील लोकगीतांमध्ये निसर्गाला महत्त्वाचे स्थान असते.

आदिवासी लोकगीत हे ज्या ज्या विधि-प्रसंग, सण-उत्सवाशी निगडित असतात त्यानुसार त्यांचे प्रकार असतात. विविध प्रकार असलेल्या या लोकगीतांमध्ये गोडवा गोवतच आशय संपन्न असे जीवनचित्रण आहे. संपूर्ण जीवन जगण्याची धडपड त्यामधून व्यक्त होतांना दिसते. बोलीभाषेतील या लोकगीतांना त्यामुळेच गती मिळते. कारण आपुलकी व जिव्हाळ्याचे वर्णन त्या गीतामध्ये आढळते. सामूहिक भावना व्यक्त होणाऱ्या या लोकगीतांद्वारा समाजाने नियम काटेकोरपणे पाळले जातात हे लक्षात येते. जसे की विवाह, मृत्यु, पूजा-विधी यंचे प्रसंगानुसार समूहाने उपस्थित राहणे, सहकार्य करणे, आपुलकी-विश्वासाचे नाते टिकवून ठेवणे हे समाजाची बांधिलकी दर्शविते. समाजातील काही वाईट प्रथा, अंधश्रद्धा, व्यसन, अज्ञान यांचे ही प्रतिक्रिया काही लोकगीतांमधून दिसून येते.

भिल्ली बोलीभाषेतील लोकगीतांमध्ये सहजता असल्याने ती जिवंत वाटतात. लोकगीतांमधून सण-उत्सव, रूढी-परंपरा यांचे चित्रण तर असते परंतु त्याबरोबर श्रम परिहार, भावनांचे प्रकटीकरण हा देखील एक उद्देश असतो. भिल्ली लोकगीतांमध्ये नृत्यातील ताल आढळतो. कारण लोकगीते ही शारीरिक क्रियांशी, धार्मिक विधीशी संबंधित असतात. समूहाने गायिली जाणारी ही लोकगीते प्रवाही वाटतात. आदिवासी समाज हा सदैव सकारात्मक, समाधानी, शांत, सहकार्य अशा भावनांनी जीवन जगत असल्यामुळे त्यांच्या लोकसाहित्यात जीवनाभिमुखता आढळते. भिल्ली लोकगीतांमध्ये नृत्य, ताल, सूर या सर्वांचा सुरेख मेळ दिसतो. कारण निसर्ग हा केंद्रबिंदु आणि स्वतःहून स्वतःसाठी आनंद निर्माण करून त्यात रममाण होणे हे त्यांचे खास वैशिष्ट्य आहे. त्यामुळेच त्यांच्या लोकगीतांमध्ये उत्साह जाणवतो. भिल्ली लोकगीतांमधून शंकर-पार्वती या त्यांच्या देवतांचे व्यक्ति चित्रण देखील दिसून येते. किंबहुना असे म्हणता येईल की त्यांना लौकिक जीवनात ज्या नात्यांशी आपुलकी, प्रेम वाटते त्यांना लोकगीतांमध्ये गुंफतात. एकूणच जन्म, विवाह,



T.S.S's. Smt. V.U. Patil Arts College Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
T.S.S's. Smt. V.U. Patil Arts &
Late Dr. B.S. Desale Science College
Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

Scanned with OKEN Scanner

विधी-परंपरा, सण-उत्सव, देव-देवता यांबरोबरच मृत्यूविषयी देखील त्यांची विधीगीते करूण अशी लोकगीते ही आढळतात

जीवनचक्र आणि ऋतुचक्राची एकत्रित गुंफण करून आदिवासी समाज आपल्या लोकजीवनाचा आविष्कार लोकगीतांमधून सहज, जिवंत आणि आशयसंपन्नरित्या करीत असला तरी जागतिकीकरणाच्या प्रभावाने त्यांना देखील आपल्या वेढ्यात वेढलेले आहे. जसे की नोकरी व्यवसाय निमित्त क्षेत्रातील लोकांची शहरांकडे ओढ त्यामुळे आदिवासी समाजातील अनेक पारंपरिक व्यवसाय, टोपले-सुप बनविणे, सुतारकाम इ. यामध्ये देखील आधुनिकीकरणाने प्रवेश केला आहे. त्यानुसार त्या त्या जातीतील लोकांचे जीवनमान, भाषाशैली यामध्ये बदल दिसून येतो. पर्यायाने त्याचा प्रभाव त्यांच्या लोकसाहित्यावर दिसून येतो. जागतिकीकरणाचा प्रभाव भाषा या समुह संस्कृती वाहक घटकावर देखील दिसून येतो. जागतिकीकरणाच्या वेढ्यात लोटल्या गेल्यानंतर आज डोंगर-दऱ्यात वापरल्या जाणाऱ्या अनेक बोलीभाषांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. तेव्हा भाषा म्हणजे समाज, संस्कृती पर्यायाने राष्ट्राच्या उभारणीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देणारा घटक होय. कोणत्याही देशाचा सांस्कृतिक इतिहास जाणून घेण्यासाठी त्या देशातील लोकसाहित्याचा अभ्यास उपयोगी ठरतो. लोकसाहित्यामध्ये जुन्यासोबत नवीन बदलांना ठाव नव्या उमेदीने घेण्याचे सामर्थ्य दिसून येते.

जागतिकीकरणाच्या प्रभावाने मूळ संस्कृतीचा विसर पडू नये व नवे बदल स्वीकारून आदिवासी लोकसाहित्याचे संकलन, संवर्धन जे होत आहे, त्याला अधिक चालना दिली पाहिजे. सामाजिक, राजकीय, शासकीय पातळीवर तसे प्रयत्न झाले पाहिजे त्याचे एकमेव कारण जीवनाच्या सर्व क्षेत्रांत होणाऱ्या अंतर्बाह्य बदलांमुळे नवे सांस्कृतिक संघर्ष जन्माला येऊ घातले आहेत. जागतिकीकरणामुळे बहुसांस्कृतिकतेची जाणीव निर्माण होऊ लागली आहे, कालमान परिस्थिती अनुसार जुन्या रूढी-परंपरा यांचा त्याग करून नवीन बाबींना स्वीकार करतांना काही नवीन समस्या उभ्या राहतात. तेव्हा लोकसाहित्य मग ते कोणत्याही समाजातील, भाषेतील असो परंतु त्यातून नैतिक, सामाजिक कल्पनांशी जखडलेले वास्तव प्रकट होतांना दिसते, हे नाकारता येत नाही.



T.S.S's. Smt. V. U. Patil Arts & Late Dr. B. S. Desale Science College Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
T.S.S's. Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

Scanned with OKEN Scanner